**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त १४ ते २८ जानेवारी दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन

अमरावती :

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तसेच मराठीचा सर्वत्र प्रचार व प्रसार व्हावा याकरिता महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे दि. १४ ते २८ जानेवारी दरम्यान महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर (शाखा अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत असून त्यानिमित्त विविध वाङ्मयीन व शैक्षणिक कार्यक्रमांचे व उपक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने व्याख्याने, बालकवी संमेलन, निबंध स्पर्धा, साहित्यकृतींचे अभिवाचन यांचा समावेश आहे.

दि. २० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या हस्ते या पंधरवड्याचे उद्‌घाटन होईल. या सत्रानंतर लगेच ११.३० वाजता सुप्रसिद्ध अनुवादक व साहित्यिक डॉ. बलवंत जेऊरकर यांचे 'मंगेश डबराल यांची कविता : अनुवाद-अनुभवकथन' या विषयावर व्याख्यान होईल. दि. २१ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता 'शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता' या विषयावर डॉ. हेमंत खडके यांचे व्याख्यान होईल. दि. २७ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बालकवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २८ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता वाङ्मयकृतींच्या अभिवाचनाचा कार्यक्रम होईल. या पंधरवड्यानिमित्त संलग्नित पाच जिल्ह्यांतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या दोन्ही गटांतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे रु. २५००/-, रु. १५००/- व रु. १०००/- अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. निबंधस्पर्धेसाठी 'मराठी असे आमुची मायबोली', 'मी काय वाचतो?, मी का वाचतो' व 'कोरोनोत्तर मराठी साहित्याची दिशा' असे विषय ठेवण्यात आले असून या स्पर्धेच्या अटी तसेच बालकवी संमेलनात सहभागी होण्यासाठीच्या अटी यांची माहिती स्वतंत्रपणे कळवली जाईल.

मायबोली मराठीच्या या गजरात सर्व भाषाप्रेमींनी ऑनलाईन पद्धतीने सामील व्हावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. मोना चिमोटे, माजी अधिष्ठाता व विभागप्रमुख डॉ. मनोज तायडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. माधव पुटवाड (९४२३७५०६०२), डॉ. हेमंत खडके (९८२२८४११९०) यांच्याशी संपर्क साधावा.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १३/०१/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी